स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन विषय

प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे विश्लेषण:

विशेष संदर्भ, नांदेडजिल्हा.(2012-13 ते 2021-22).

मानव्यविद्या-विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर

करण्यात आलेला शोध प्रबंधाचा आराखडा.

संशोधक

पठाण फरहाना सादुल्ला खान

एम.ए.अर्थशास्त्र.

मार्गदर्शक

डॉ.डी.डी.भोसले

एम.ए.,बी.एड., सेट,पीएच.डी.

यशवंत महाविद्यालय, नांदेड.

मार्च (2022).

गोषवारा(Abstract)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्यविद्या-विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्राप्त करण्यासाठी.**"प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे विश्लेषण :विशेष संदर्भ ,नांदेड जिल्हा (2012-13 ते 2021-22)."**प्रस्तुत संशोधन विषय हा संशोधकाने अध्ययनासाठी निवडलेला आहे. जगातील सर्वच देश आर्थिक विकास प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. हा आर्थिक विकास प्राप्त करण्यासाठी प्राधान्यक्रम क्षेत्र निवडून त्यांना नियोजित भांडवल पुरवठा करावा लागतो.असे विकासवादी अर्थतज्ज्ञांनी प्रतिपादित केले आहे. नांदेड जिल्ह्याच्या बाबती ,या प्राधान्यक्रम क्षेत्राला कशा पद्धतीने पतपुरवठा केला जात आहे.याचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण प्रस्तुत संशोधन अध्ययनात करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे क्षेत्रनिहाय अध्ययन करणे, नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे कालावधी निहाय अध्ययन करणे, प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे घटकनिहाय अध्ययन करणे. अशा उद्दिष्टांची मांडणी करण्यात आलेली आहे. तर नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्यात कालावधी निहाय चढ-उतार झालेली दिसून येतात, नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेला पतपुरवठा आणि त्या क्षेत्राचा आर्थिक विकास यात लक्षणीय संबंध दिसून येतो. अशा गृहितकृत्यांची मांडणी करण्यात आलेली आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने ,नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्यात दीर्घकालीन कलांमध्ये कोणतेही लक्षणीय फरक नाही, नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्यात लक्ष्याच्या मानाने साध्य कमी आहे. असे अपेक्षित निष्कर्ष काढले आहे. प्रस्तुत संशोधन करताना संख्यात्मक विश्लेषण पद्धती तसेच वर्णनात्मक विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात येईल. तसेच प्रमुख पाच प्रकरणांमध्ये संशोधन समस्या मांडून अध्ययनाचे विश्लेषण करण्यात येईल.

1)प्रस्तावना(Introduction)

भारत हा एक विकसनशील देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची प्रामुख्याने तीन क्षेत्रात विभागणी केली जाते.कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र, सेवाक्षेत्र इत्यादी. भारतातील राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी या तीन क्षेत्रावरच अवलंबून असते.प्रामुख्याने सेवा क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा राष्ट्रीय उत्पन्नात जास्त असतो. कृषी व उद्योग क्षेत्रातील वाटा वाढवण्यासाठी,रिझर्व्ह बँक ऑफ इंडियासीमांत शेतकऱ्यांना व लहान उद्योजकांना प्राधान्यक्रम क्षेत्र ठरवून त्या मार्फत पतपुरवठा करते. प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणारा पतपुरवठा हा जागतिक तसेच राष्ट्रीय ,राज्य व जिल्हा पातळीवर केला जातो. थोडक्यात, सीमांत शेतकरी व लहान उद्योजकांचा विकास केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचाही विकास होईल.

प्राधान्यक्रम क्षेत्राला पतपुरवठा करण्याचे कार्य हे व्यापारी बँका करत असतात. थोडक्यात ,बँका ह्या देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. 1991 च्या औद्योगिक धोरणानंतर बँकिंग क्षेत्राला अधिक महत्त्व प्राप्त झाले .आजच्या आर्थिक स्थितीत बँकांच्या मदतीशिवाय आपण कोणत्याही व्यावसायिक क्रियांचा विचार करू शकत नाही .भारताच्या आर्थिक विकासात बँकिंग क्षेत्राचा मोलाचा वाटा आहे. औद्योगिक विस्तार ,कृषी विकास आणि आर्थिक विकासासाठी बँका अत्यंत महत्त्वाच्या आहेत .कंपन्यांचे कार्पोरेट प्रशासन आणि भांडवलाचे वाटप , बँकांद्वारे निधीचे वाटप, कंपन्यांसाठी भांडवलाची किंमत कमी करणे , भांडवल मजबूत करणे इत्यादी कामे व्यापारी बँका करतात .थोडक्यात अर्थव्यवस्थेच्या प्राधान्यक्रम क्षेत्राला व्यावसायिक बँकांकडून वित्त पुरवठा करणे हा बँकांच्या समाजवादी दृष्टीकोनाचा एक महत्त्वाचा चिन्ह आहे.

इ.स.1967 ते 68 पूर्वी बँकेने मोठ्या आणि मध्यम उद्योगांना आणि व्यावसायिक घराण्यांना निर्देशित केले होते तर कृषी, लघु उद्योग आणि निर्यातीकडे दुर्लक्ष केले होते. सप्टेंबर 1990 मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने डी.आर.आई.च्या ऍडव्हान्स चा अपवाद वगळता व्याजदरातील सवलत काढून टाकण्याचा एक मोठा निर्णय घेतला. तेव्हा पासून व्याजाचा दर कर्जाच्या आकाराशी संबंधित असेल असे ठरवले गेले. भारतात कार्यरत असलेल्या विदेशी बँकांना 1992 च्या अखेरीस त्यांच्या निव्वळ बँक क्रेडिट च्या 15 टक्क्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्राधान्य क्षेत्रातील प्रगती करण्याचा सल्ला देण्यात आला होता .एप्रिल 1993 मध्ये प्राधान्य क्षेत्रासाठी 32 टक्के वाढ होऊन त्यात 10 टक्के लघु उद्योगांसाठी, 12 टक्के निर्यातीसाठी होते . जे 1992 पर्यंत साध्य करावयाचे होते.नवीन खाजगी क्षेत्रातील बँका आणि खाजगी क्षेत्रातील स्थानिक क्षेत्रीयबँकांना 1996 मध्ये 40 टक्के उद्दिष्ट गाठण्याचा सल्ला देण्यात आला होता .त्या उद्दिष्टांच्या स्थानिक क्षेत्रातील बँकांना त्यांच्या प्राधान्य क्षेत्राच्या किमान 25 टक्के कर्ज दुर्बल घटकांना देणे आवश्यक होते. सध्या 2021 ते 22 ला प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करता येईल

ऐतदेशीय बँका- एकूण ए.एन.बी.सी. च्या 40%

विदेशी बँका- एकूण ए.एन.बी.सी.च्या 40%

प्रादेशिक ग्रामीण बँका- एकूण ए.एन.बी.सी.च्या 75 %

लघु बँका- एकूण ए.एन.बी.सी.च्या 75%

शहरी सहकारी बँका- एकूण ए.एन.बी.सी.च्या 75 %.

2) प्राधान्यक्रम क्षेत्राचा अर्थ व व्याख्या:(Meaning and Definition of Priority Sector)

Priority या शब्दाचा शब्दशः अर्थ प्राधान्य देणे किंवा अग्रक्रम देणे असा होतो. तर प्रायोरिटी सेक्टर म्हणजेच प्राधान्यक्रम क्षेत्र होय. तर प्रायोरिटी सेक्टर लेंडिंग म्हणजेच प्राधान्यक्रम क्षेत्र पतपुरवठा होय. भारत सरकार कृषी व उद्योग क्षेत्रातील सीमांत शेतकरी व लहान उद्योजकांना त्यांच्या आर्थिक विकासासाठी आर.बी.आय.च्या आदेशानुसार,एक निश्चित क्षेत्र ठरवून कर्जपुरवठा करते .थोडक्यात ,आर.बी.आय.च्या आदेशानुसार ,भारतातील विविध वाणिज्यिक बँका सीमांत शेतकरी व लहान उद्योजकांना कर्ज पुरवठा करताना प्राधान्य देतात. यालाच प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणारा पतपुरवठा असे म्हणतात.

व्याख्या:(Defination)

" कृषी आणि कृषी आधारित गतिविधि, सूक्ष्म आणि लघुउद्योग, गरिबांसाठी घरे, शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना कर्ज देणे आणि इतर क्षेत्रांना आर.बी.आय.च्या आदेशानुसार व्यावसायिक बँकांद्वारे जो पतपुरवठा केला जातो . त्यास प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणारा पतपुरवठा असे म्हणतात."

यात खालील घटकांचा समावेश होतो.

1) कृषी व कृषी आधारितक्रिया
2) लघु उद्योग
3) लघु व्यवसाय किंवा सेवा उद्योग
4) सूक्ष्म वित्त पुरवठा
5) शिक्षण कर्ज
6) गृहकर्ज
7) अक्षय ऊर्जा क्षेत्र
8) इतर क्षेत्र .

3) प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याची बँका नुसार विभागणी:

भारतात राष्ट्रीय राज्य व जिल्हा स्तरावर अनेक व्यापारी बँका प्राधान्यक्रम क्षेत्राला पतपुरवठा करतात.ते आर.बी.आय.ने ठरविलेल्या विशिष्ट मार्गदर्शक तत्वानुसार केले जाते. याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येई

तक्ता क्र.1

प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याची बँका नुसार विभागणी(आकडेवारी प्रतिशत मध्ये)

1)ऐतदेशीयबँका	एकूण ए.एन.बी.सी.च्या 40%
2)विदेशी बँका	एकूण ए.एन.बी.सी.च्या 40 %
3)प्रादेशिक ग्रामीण बँका	एकूण ए.एन.बी.सी.च्या 75 %
4)लघु बँका	एकूण ए.एन.बी.सी.च्या 75%

संदर्भ:Master directions-Priority sector lending(PSL)Targets and Classification(updated as onOctober 26,2021)RBI/FIDD/2020-21/72

Graph no. 1

प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याची बँका नुसार विभागणी(आकडेवारी प्रतिशत मध्ये)



संदर्भ:Master directions-Priority sector lending(PSL)Targets and Classification(updated as onOctober 26,2021)RBI/FIDD/2020-21/72

ऐतदेशीय बँका त्यांच्या एकूण कर्जाच्या 40 टक्के कर्ज पुरवठा प्राधान्यक्रम क्षेत्राला करतात .तर विदेशी बँका त्यांच्या एकूण कर्जाच्या 40 टक्के कर्ज पुरवठा प्राधान्यक्रम क्षेत्राला करतात .तर प्रादेशिक ग्रामीण बँका त्यांच्या एकूण कर्जाच्या 75 टक्के कर्ज पुरवठा प्राधान्यक्रम क्षेत्राला करतात .तर लघु बँका त्यांच्या एकूण कर्जाच्या 75 टक्के कर्ज पुरवठा प्राधान्यक्रम क्षेत्राला करतात .तसेच शहरी सहकारी बँका त्यांच्या एकूण कर्जाच्या 75% कर्जपुरवठा प्राधान्यक्रम क्षेत्राला करतात .थोडक्यात, वरील मार्गदर्शक तत्त्वांचा पालन करणे आर.बी.आय.ने व्यापारी बँकांना बंधनकारक केले आहे.

4)प्राधान्यक्रम क्षेत्रालाकरण्यात आलेल्या पतपुरवठ्याची घटकनिहाय पतपुरवठ्याची विभागणी:

तक्ता क्र.2

प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याची घटकनिहाय विभागणी(आकडेवारी प्रतिशत मध्ये)

1) कृषी	18%
2) लघु उद्योग	7.5%
3) घरे	4.5%
4) इतर	12%

संदर्भ:Master directions-Priority sector lending(PSL)Targets and Classification(updated as on October 26,2021) RBI/FIDD/2020-21/72.

Graph no.2

प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याची घटकनिहाय विभागणी(आकडेवारी प्रतिशत मध्ये)



संदर्भ:Master directions-Priority sector lending(PSL)Targets and Classification(updated as on October 26,2021) RBI/FIDD/2020-21/72.

देशांतर्गत व्यापारी बँकांना त्यांच्या एकूण कर्जाच्या 40 टक्के कर्ज पुरवठा हा प्राधान्यक्रम क्षेत्राला करावा लागतो .त्यानुसार व्यापारी बँका 18 टक्के कर्ज कृषी क्षेत्राला, 7.5% लघुउद्योगाला, 4.5% कर्जपुरवठा गरिबांसाठी घरे बनवायला,12टक्के इतर क्षेत्रासाठी करतात.

5) प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्यापतपुरवठ्याच्या मर्यादा:(Limitations of priority sector lending)

प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणाऱ्या पुरवठ्यावर काही मर्यादा पडतात. त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.

तक्ता क्र.३

प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याच्या मर्यादा(आकडेवारी कोटींमध्ये)

क्षेत्र		मर्यादा
1)	सामाजिक सुविधा	10 कोटी
2)	निर्यात.	40 कोटी
3)	घरे मेट्रो सिटी.	35 लाख
4)	घरे इतर शहर.	25 लाख
5)	घर दुरुस्ती कर्ज मेट्रो सिटी	5 ते10लाख

6) घर दुरुस्ती कर्ज इतर शहर	2 ते 6लाख
7) शिक्षण.	20 लाख
8) मागास क्षेत्र.	50 हजार
9) अक्षय ऊर्जा.	30 करोड
10)लहान व सीमांत शेतकऱ्यांना कर्ज	2 लाख

संदर्भ:Master directions-Priority sector lending(PSL)Targets and Classification(updated as on October 26,2021) RBI/FIDD/2020-21/72.

Graph no.3

प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याच्या मर्यादा(आकडेवारी कोटींमध्ये)



संदर्भ:Master directions-Priority sector lending(PSL)Targets and Classification(updated as on October 26,2021) RBI/FIDD/2020-21/72.

6)संशोधन साहित्याचा आढावा(Review of literature)

प्रस्तुत विषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधन साहित्याचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात येणार आहे.

6.1)संदर्भ ग्रंथ:प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित झालेले संदर्भग्रंथ द्वितीयक साधनसामग्री म्हणून वापरण्यात येणार आहेत.

6.2)संशोधन नियतकालिक: प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने विविध नियतकालिकात प्रकाशित करण्यात आलेल्या शोधनिबंधात चा वापर करण्यात येणार आहे.प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने विविध विद्यापीठांमध्ये पीएच.डी. संपादन करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या अप्रकाशित प्रबंधाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

7) संशोधनाची उद्दिष्टे(Objectives of research)

7.1) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे क्षेत्रनिहाय अध्ययन करणे.

7.2) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे बँक निहाय अध्ययन करणे.

7.3) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे घटकनिहाय अध्ययन करणे.

7.4) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे कालावधी निहाय अध्ययन करणे.

7.5) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे कल आणि संरचना अभ्यासणे.

7.6) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचेअध्ययन करून ,प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने येणा-या समस्यावर उपाययोजना सुचविणे.

8) संशोधनाचे गृहीतकृत्य (Hypothesis of research)

8.1) नांदेड जिल्ह्यातील व्यापारी बँकांमध्ये प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्यात, लक्ष्याच्या मानाने साध्य कमी आहे.

8.2) नांदेड जिल्ह्यातील व्यापारी बँकांमध्ये कृषिक्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्यात, लक्ष्याच्या मानाने साध्य कमी आहे.

8.3) नांदेड जिल्ह्यातील व्यापारी बँकांच्या एन.पी. ए.वर पी .एस. एल.चा कोणताही विशेष प्रभाव झालेला नाही.

8.4) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्यात, कालावधी निहाय चढ-उतार झाले आहेत.

8.5) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेला पतपुरवठा व त्या क्षेत्राचा आर्थिक विकास यांच्यात लक्षणीय संबंध आहे.

8.6) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठा व सरकारी धोरणानुसार बदल झाल्याचे दिसून येते.

8.7) नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेला पतपुरवठा आणि क्षेत्र यांच्यात लक्षणीय संबंध दिसून येतो.

9)संशोधन विषयाची निवड(Selection of research topic)

भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठीआर.बी.आय..द्वारे ,प्राधान्यक्रम क्षेत्राला राष्ट्रीय पातळीवर, राज्य पातळीवर व जिल्हा पातळीवर विविध व्यापारी बँका द्वारे पतपुरवठा केला जातो. महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला होणारा पतपुरवठा हा आर.बी.आय. ने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार होत आहे किंवा नाही.याचे विश्लेषण करण्यासाठी प्रस्तुत अध्ययन विषयाची निवड करण्यात आली आहे. तसेच प्राधान्यक्रम क्षेत्राद्वारे करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याचा ,त्या क्षेत्राच्या विकासावर काय परिणाम होत आहे .याचे अध्ययन करण्यासाठी प्रस्तुत अध्ययन विषयाची निवड करण्यात आली आहे.त्याचबरोबर प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्यात कोणत्या तांत्रिक अडचणी येत आहेत. याचे अध्ययन करून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

10) संशोधन पद्धती(Research Methodology)

“प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे विश्लेषण :विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (2012-13 ते 2021-22).”प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी संख्यात्मक विश्लेषण तसेच वर्णनात्मक विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे

10.1)तथ्य संकलन:

a) प्राथमिक आधारसामग्री: प्रस्तुत अध्ययन विषयात तथ्य संकलनासाठी प्राथमिक आधारसामग्रीचा वापर करण्यात येईल. यात प्रामुख्याने प्रश्नावली, प्रत्यक्ष मुलाखत इत्यादी द्वारे माहितीचे संकलन केले जाईल.

b) द्वितीयक आधार सामग्री: प्रस्तुत संशोधनात द्वितीयक आधार सामग्रीचा वापर करण्यात येईल .यात प्रामुख्याने तथ्य संकलनासाठी वर्तमानपत्रे, मासिके, शोध प्रबंध, प्रकाशित लेख इ. वापरण्यात येईल.

10.2) तथ्य विश्लेषण: प्रस्तुत संशोधनात तथ्य विश्लेषणासाठी समांतर माध्य, तक्ता, आकृती ,आलेख तसेच t टेस्ट, f टेस्ट आणि गुणात्मक

साहचर्य चाचणी तसेच annova टेबल इ.गरजेनुसार वापरण्यात येईल

.

11) संशोधन विषयाचे महत्त्व (Importance of research topic)

देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी, बँकांसाठी तसेच प्राधान्यक्रम क्षेत्रांच्या ग्राहकांसाठी ,प्रस्तुत अध्ययन विषय महत्त्वाचा आहे. प्रस्तुत अध्ययन विषयाचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्व तसेच राष्ट्रीय पातळीवरील महत्त्व व क्षेत्रीय किंवा प्रादेशिक पातळीवरील महत्त्व पुढीलप्रमाणे पाहता येईल.

11.1) आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्व (Importance of international level)

प्राधान्यक्रम क्षेत्राची संकल्पना इतर देशांमध्ये देखील आहे .इतर देशांमध्ये प्राधान्यक्रम क्षेत्राला निर्देशीत कर्ज कार्यक्रम म्हणून ओळखले जाते(directed lending program). एस.सी. मूर्ती यांच्या मार्गदर्शनाखाली,आर.बी.आय. च्या कार्यकारी गटाने प्राधान्यक्रम क्षेत्राचे आंतरराष्ट्रीय आकलन सादर केले इ.स..1970 ते 80 मध्ये डि .एल. पी.विकसित आणि विकसनशील देशांनी विकासासाठी स्वीकारलेले मुख्य साधन होते. या पेपरमध्ये चार देशांच्या (जपान ,कोरिया ,भारत, चीन)निर्देशित कर्ज कार्यक्रम पद्धतींची तुलना करण्यात आली .जपानने एकूण संसाधनांच्या 20 टक्के, कोरियाने एकूण संसाधनांच्या 50 टक्के आणि चीनने प्राधान्य क्षेत्रासाठी एकूण बँक कर्जाच्या एक तृतीयांश कर्ज पुरवले .भारतामध्ये प्राधान्य क्षेत्राची व्याप्ती काळानुसार रुंदावत आहे. थोडक्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राधान्यक्रम क्षेत्राला अतिशय महत्त्व आहे.

11.2) राष्ट्रीय पातळीवरील महत्त्व (Importance of national level)

भारताच्या अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी प्राधान्यक्रम क्षेत्राला अतिशय महत्त्व आहे. प्राधान्यक्रम क्षेत्रांतर्गत येणाऱ्या कृषी क्षेत्र ,एम. एस. एम. ई.व इतर प्राधान्यक्रम क्षेत्राचा विकास झाल्यास संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विकास होईल .थोडक्यात, राष्ट्रीय पातळीवर अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी प्राधान्यक्रम क्षेत्राला अतिशय महत्त्व आहे.

11.3) क्षेत्रीय पातळीवरील महत्व(Importance of sector level)

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर प्राधान्यक्रम क्षेत्राला जेवढे महत्त्व आहे .तेवढेच महत्त्व क्षेत्रीय पातळीवर आहे. थोडक्यात ,देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सर्वच क्षेत्रावर प्राधान्यक्रम क्षेत्राला महत्त्व प्राप्त झाले आहे.

12) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope and limitations of research)

प्रस्तुत संशोधनात अध्ययन कालावधी(2012-13ते2021-22) असा दहा वर्षाचा घेण्यात आला आहे. ही कालावधीची मर्यादा पडते .तसेच प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्हा पुरतेच मर्यादित आहे. ती क्षेत्राची मर्यादा पडते .तसेच प्रस्तुत संशोधनात सांख्यिकीय संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाईल. ती संशोधन पद्धतीची मर्यादा पडते .प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याचे विश्लेषण केले जाईल. तसेच राष्ट्रीय ,राज्य स्तरावर करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याचा आढावा घेण्यात येईल.

13) प्रकरणांची रूपरेषा (Chapter'scheme)

प्रकरण पहिले: प्रस्तावना आणि संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्राधान्यक्रम क्षेत्राचा अर्थ ,व्याख्या, प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याची बँकांसह विभागणी ,प्राधान्यक्रम क्षेत्रातील घटकांच्या पतपुरवठ्याची विभागणी, प्राधान्यक्रम क्षेत्र कर्जाच्या मर्यादा इत्यादीचे स्पष्टीकरण दिले जाईल. तसेच अध्ययन विषयाच्या निवडीचे महत्त्व, संशोधनाचे उद्देश, गृहीत कृत्य, संशोधन पद्धती, तथ्य संकलन ,विश्लेषणाची साधने, संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा इ. सर्व घटकांचे विश्लेषण केले जाईल.

प्रकरण दुसरे :नांदेड जिल्हा एक दृष्टीक्षेप

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान, दिशा, जिल्ह्याचा नकाशा, जिल्ह्याचा समग्र भौगोलिक आढावा स्पष्ट करण्यात येईल. तसेच नांदेड जिल्ह्याची आर्थिक स्थिती, वैशिष्ट्ये, निवडक सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण केले जाईल.

प्रकरण तिसरे :संशोधन साहित्याचा आढावा

. प्रस्तुत प्रकरणात सदरील संशोधन विषयाशी संबंधित विविध संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे .हा आढावा घेताना संशोधन साहित्याचे पुढील भागात वर्गीकरण केले आहे .भाग -1 या अंतर्गत सदरील संशोधन विषयाशी संबंधित वेगवेगळ्या संशोधन नियतकालिकात प्रकाशित झालेल्या शोध निबंधाचा आढावा घेण्यात आला आहे .भाग -2 या अंतर्गत विविध विद्यापीठांमध्ये सादर केलेले अप्रकाशित शोध प्रबंध व त्यातील निष्कर्ष आणि शिफारसींचा आढावा घेण्यात आला आहे . भाग -3 या अंतर्गत अध्ययन विषयाशी संबंधित ग्रंथाचे संक्षिप्त स्वरूपात विश्लेषण केले आहेत.

प्रकरणचौथे:नांदेड जिल्ह्यातील प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्याचे विश्लेषण:

या प्रकरणाअंतर्गत प्राथमिक तथ्याद्वारे संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात येईल .तसेच द्वितीयक सामग्री द्वारे संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

. प्रस्तुत प्रकरणात प्राधान्यक्रम क्षेत्र संदर्भात केलेल्या तथ्य संकलनातून मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्षांची मांडणी करण्यात येईल .संशोधनाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण शिफारशी सुचविण्यात येतील.

14) वर्षनिहाय कामाचा आराखडा (Year wise plan of work)

प्रस्तुत संशोधनात विषयाची मांडणी व त्या बरोबर प्रबंध लेखनाचे काम करण्यासाठी वर्षनिहाय नियोजित आराखडा खालीलप्रमाणे राहील.

14.1)प्रथम वर्ष:विषयाच्या अनुषंगाने अध्ययन सामग्री संकलन व प्रथम प्रकरणाची रूपरेषा व मांडणी करणे याच बरोबर तथ्य संकलन करून संशोधन साहित्याचा आढावा इत्यादी तयार करण्यात येईल.

14.2)द्वितीय वर्ष:द्वितीय वर्षामध्ये संकलित करण्यात आलेल्यातथ्यांचे अध्ययन करून त्याचे विश्लेषण करण्यात येईल.

14.3)तृतीय वर्ष:तृतीय वर्षामध्ये गृहितकृत्यांची पडताळणी ,निष्कर्ष आणि शिफारसी मांडण्यात येतील .त्याचबरोबर संपूर्ण प्रकरणांची एकत्र बांधणी करून प्रबंध विद्यापीठात सादर करण्यात येईल.

15) अपेक्षित निष्कर्ष (Expected outcome)

15.1) नांदेड जिल्ह्यातील व्यापारी बँकांमध्ये प्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्यात दीर्घकालीन कलांमध्ये कोणतेही लक्षणीय फरक नाही .

15.2) नांदेड जिल्ह्यातील व्यापारी बँकांमध्येप्राधान्यक्रम क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्यात लक्ष्याच्या मानाने साध्य कमी आहे.

15.3) नांदेड जिल्ह्यातील व्यापारी बँकांच्या एन.पी.ए. वर पी.एस.एल.चा कोणताही विशेष प्रभाव नाही.

16) संदर्भ ग्रंथ सूची (Bibliography).

संदर्भ ग्रंथ (Reference books)

a) देशमुख राम (2019) :*मूलभूत सांख्यिकी* (विद्या प्रकाशन, नागपूर).

b) Gupta S.P. (Jan 2019):-*statistical methods* ,sultan chand and sons publication.

c) IIBF:*taxmanns bankers handbook on credit management by iibf.*

d) Koutilya K.(2017): *research aptitude*,upkar prakashan,agra.

e) Kothari C.R..and gaurav garg (sept 2017) :*research methodology methods and techniques* ,new age international publishers,fourth edition.

f) Koli lakshmi narayan (jan 2017) :*research methodology* ,y.k.publishers.

g) Puri V.K..and Mishra S.K. (Jan 2018).:*Indian economy*, himjanalaya publishing house pvt .limited..

h) Rao D.V.S..and V.T. Raju (2017) :*economics of farm production and management*, oxford and ibh publishing co.pvt ..ltd.

संशोधन नियतकालिक (research journal):

SusenaK.C.(research paper 2021):*a study on impact of psl on gross npa of nationalized* bank.

संकेतस्थळ सूची (Websites):

a) www.academia.edu.in-1-3-2022.
b) http//doi.org.in-1-3-2022.
c) www.google.com.
d) http//m.rbi.org.in-1-3-2022.
e) http//shodhganga.inflibnet.ac.in-16-3-2020.
f) www.srtmun.ac.in.-1-2-2022.

संशोधक.

पठाण फरहाना सादुल्लाखान

एम.ए.अर्थशास्त्र

मार्गदर्शक

प्रा. डॉ. डी. डी .भोसले,

एम.ए.,बी.एड.,सेट,पीएच.डी.

यशवंत महाविद्यालय, नांदेड.

.